

वर्ष - 7 । अंक - 137 | UDYAM-MH-26-0158827

# महाईन्यूज™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | । शुक्रवार, दिनांक 22 सप्टेंबर 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews


## राष्ट्रवादीतील फुटीचे राजकारण

# पार्थ विरुद्ध रोहित आमनेसामने!

### शरद पवार-अजित पवार यांच्यानंतर आता चुलत बंधूंमध्ये राजकीय संघर्षाची शक्यता

**।पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**राष्ट्रवादी कॉंग्रेसमधील फुटीनंतर शरद पवार आणि अजित पवार असा चुलते- पुतणे संघर्ष सुरु असताना आता पवार कुटुंबातील तिस-या पिढीतील रोहित आणि पार्थ पवार या दोन चुलत बंधूंमध्ये राजकीय संघर्ष सुरु होण्याची शक्यता आहे. पार्थनंतर आता आमदार रोहित यांनीही पिंपरी-चिंचवडच्या राजकारणात लक्ष घातले आहे. त्यामुळे दोन बंधूंच्या संघर्षाचा नवा अध्याय पिंपरी-चिंचवडकरांना पहायला मिळण्याची शक्यता आहे.**




### शरद पवारांची ऑक्टोबरमध्ये जाहीर सभा

» पिंपरी-चिंचवडचा बालेकिल्ला पुन्हा ताब्यात घेण्यासाठी पवार कुटुंबासह राष्ट्रवादीच्या इतर नेत्यांनीही लक्ष घातले आहे. प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, माजी मंत्री शशिकांत शिंदे हे शहरातील राजकारणावर लक्ष ठेवून असतात. पक्षाचे मोठे मध्यवर्ती जनसंपर्क कार्यालयही सुरु केले आहे. शरद पवार यांची ऑक्टोबर अखेरीस शहरात जाहीर सभा होणार आहे. या सभेला खासदार सुप्रिया सुळेही उपस्थित राहणार आहेत.

बारामती खालोखाल पिंपरी-चिंचवड हा राष्ट्रवादी कॉंग्रेसचा बालेकिल्ला मानला जातो. या बालेकिल्ल्यात उपमुख्यमंत्री अजित पवारांची दादागिरी चालते. त्यांच्यासोबत त्यांचे पुत्र पार्थ यांचेही शहरात लक्ष असते. परंतु, आता हा बालेकिल्ला पुन्हा एकदा शरद पवारांना काबीज करायचा आहे. त्यासाठी त्यांनी नातू आमदार रोहित पवारांकडे पिंपरी-चिंचवडची धुरा सोपविली. त्यामुळे भविष्यात शहराच्या राजकारणात काका अजित विरुद्ध पुतणे रोहित आणि रोहित विरुद्ध पार्थ पवार या बंधूमध्ये राजकीय संघर्ष पहायला मिळू शकतो.

पार्थ यांनी थेट लोकसभेची निवडणूक लढवत राजकारणात उडी घेतली. तर, रोहित यांनी जिल्हा परिषदेपासून राजकारणाची सुरुवात केली. कर्जत-जामखेडमधून विधानसभेवर निवडून गेले. लोकसभेतील दारुण पराभवानंतर पार्थ यांनी पिंपरी-चिंचवडमध्ये लक्ष घालण्यास सुरुवात केली खरी पण, दरबारी राजकारण सुरु केले. थेटपणे जनतेत मिसळताना दिसले नाहीत. याउलट रोहित हे दूरुन शहराचे राजकारण पाहत होते. त्यांचा थेट संपर्क नव्हता. आता पक्षातील फुटीनंतर रोहित यांनी शहरात बारकाईने लक्ष घातले. शहराचा विकास शरद पवार यांच्यामुळेच झाला. अजित पवार यांच्याकडे शहराचे नेतृत्व शरद पवारांनीच दिले होते. अजित पवारांना शरद पवारांमुळेच शहरात ओळख मिळाल्याचे अप्रत्यक्षपणे सांगितले. शहराच्या पहिल्याच दौ-यात रोहित यांनी आक्रमक भूमिका घेतली. अप्रत्यक्षपणे अजित पवारांना धारेवर धरले. तरुण तुषार कामठे यांच्याकडे शहराध्यक्षपदाची धुरा सोपविली. संघटना म्हणून मोठी ताकद लावली जाईल. शरद पवार यांच्या विचारांचे नगरसेवक निवडून आणले जातील. कोणाच्या सांगण्यावरुन नव्हे तर सर्वेक्षण करुन उमेदवारी दिली जाईल, असे सांगितले. रोहित यांची भाषण शैली, लोकांमध्ये मिसळणे ही कार्यपद्धती युवांना भावताना दिसते. याउलट पार्थ दरबारी राजकारण करताना दिसतात. नियमितपणे शहराकडे न फिरकणे, जनतेत न मिसळणे, केवळ प्रशासकीय अधिका-यांना पार्थ भेटताना दिसले. लोकसभेला पाच लाख मते मिळूनही ते चिंचवड विधानसभेच्या पोट निवडणुकीपासून दूर राहिले. वडिलांचा बालेकिल्ला शाबूत ठेवण्यासाठी पार्थ तर आजोबांना पुन्हा शहरातील सत्ता मिळवून देण्यासाठी रोहित प्रयत्नशील आहेत. त्यामुळे या दोन चुलत बंधूमधील संघर्ष पिंपरी-चिंचवडकरांना पहायला मिळण्याची शक्यता नाकारता येत नाही.

---

# शहरातील मोकाट जनावरांसाठी गोशाळा उभारावी!

### दीपक मोढवे पाटील यांची मागणी : अतिरिक्त आयुक्त विजय खोराटे यांना निवेदन

**। पिंपरी । महाईन्यूज ।**

पिंपरी-चिंचवड शहरातील मोकाट जनावरांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. अनेकदा भर रस्त्यात किंवा गर्दीच्या ठिकाणी या जनावरांनी ठिय्या मांडल्यामुळे नागरिक आणि वाहनचालकांना नाहक त्रास सहन करावा लागतो. तसेच, राज्यात सध्या लम्पी आजाराने जनावरांच्या जीवितास धोका निर्माण झाला आहे. त्यामुळे महापालिका प्रशासनाने मोकाट जनावरांसाठी गोशाळा उभारावी. ज्यामुळे त्यांचे उपचार आणि देखभाल करणे सोईचे होईल, अशी मागणी भाजपा वाहतूक आघाडीचे शहराध्यक्ष दीपक मोढवे पाटील यांनी केली आहे.

याबाबत महापालिका आयुक्त शेखर सिंह आणि अतिरिक्त आयुक्त विजय खोराटे यांना निवेदन देण्यात आले आहे. त्यामध्ये म्हटले आहे की, पिंपरी-चिंचवड शहरासह देशभरात भटक्या गुरांची समस्या आहे. देशात मा. श्री. नरेंद्रजी मोदी सरकारच्या काळामध्ये गोवंश संवर्धनासाठी पुढाकार घेण्यात आला. राज्यात तत्कालीन मुख्यमंत्री श्री. देवेंद्रजी फडणवीस यांच्या पुढाकाराने गोवंश संवर्धन कायदा मंजूर करण्यात आला. असे असताना शहरातील मोकाट जनावरे आजही निराधार आहेत. याबाबत महापालिका प्रशासनाने सकारात्मक दृष्टीने पुढाकार घेण्याची आवश्यकता आहे.



### मोकाट जनावरांमुळे वाहतुकीला अडथळा

» शहरात सध्या गणेशोत्सवामुळे बाजारपेठांमध्ये नागरिकांची मोठी गर्दी आहे. मात्र, काही ठिकाणी मोकाट जनावरांमुळे वाहतुकीला अडथळा होत आहे. तसेच, या जनावरांच्या देखभालीची व्यवस्था नसल्यामुळे नागरिकांमध्ये नाराजीचा सूर आहे.परिणामी, शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी मोकळ्या जागेत मोकाट जनावरांसाठी गोशाळा विकसित करावी. त्या ठिकाणी या सर्व जनावरांना मुक्त गोठा करुन ठेवण्यात यावे. सदर गोशाळा व्यवस्थापनाचे काम प्राणी प्रेमी किंवा गोवंश संवर्धनासाठी काम करणाऱ्या संस्थेला द्यावे.

# उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी घेतले 'दगडूशेठ' गणपतीचे दर्शन!

## गणपती दर्शनासाठी बावनकुळेंचा विना हेल्मेट प्रवास

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गुरुवारी सायंकाळी श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपतीचे दर्शन घेतले. यावेळी त्यांनी गणरायाची आरती देखील केली. श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट, सुवर्णयुग तरुण मंडळ च्यावतीने ट्रस्टच्या 131 व्या वर्षी गणेशोत्सवात देवेंद्र फडणवीस यांचे सन्मानचिन्ह देऊन स्वागत करण्यात आले.**



यावेळी ट्रस्टचे सरचिटणीस हेमंत रासने, कोषाध्यक्ष महेश सूर्यवंशी, उपाध्यक्ष सुनील रासने, उत्सव प्रमुख अक्षय गोडसे, सरचिटणीस अमोल केदारी यांसह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. पुणे दौऱ्यावेळी कसबा गणपती, तांबडी जोगेश्वरी गणपती, गुरुजी तालीम गणपती, तुळशीबाग गणपती व केसरी गणपती या पुण्यातील मानाच्या पहिल्या पाच गणपतींचे दर्शन घेण्यासाठी भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी ट्रॉफिकमुळे कार्यकर्त्यांसह दुचाकीवर प्रवास केला. पुण्यातील रस्त्यावरील गर्दी लक्षात घेऊन वाहनांचा ताफा टाळत चंद्रकांत पाटलांनी मागील वर्षी एका ट्रॅफिक पोलिसांच्या मोटरसायकलवर मागे बसून प्रवास केला आहे. त्यांनी पुण्याचे ग्रामदैवत असलेल्या कसबा गणपतीचे दर्शन घेतले. त्यानंतर भाऊ रंगारी गणपतीच्या प्रतिष्ठापणेसाठी ते जाण्यासाठी निघाले होते. मात्र रस्त्यावरील गर्दी पाहता त्यांनी वाहनांचा ताफा टाळत एका ट्रॅफिक पोलिसाच्या मोटरसायकलवर बसून प्रवास केला. त्यांनी हा प्रवास करत असतांना विनाहेल्मीट प्रवास केल्याने त्यांच्यावर टीका करण्यात आली होती.

### मागील वर्षी चंद्रकांत पाटलांचा प्रवास

» पुण्यातील रस्त्यावरील गर्दी लक्षात घेऊन वाहनांचा ताफा टाळत चंद्रकांत पाटलांनी मागील वर्षी एका ट्रॅफिक पोलिसांच्या मोटरसायकलवर मागे बसून प्रवास केला आहे. त्यांनी पुण्याचे ग्रामदैवत असलेल्या कसबा गणपतीचे दर्शन घेतले. त्यानंतर भाऊ रंगारी गणपतीच्या प्रतिष्ठापणेसाठी ते जाण्यासाठी निघाले होते. पुणे दौऱ्यावेळी कसबा गणपती, तांबडी जोगेश्वरी गणपती, गुरुजी तालीम गणपती, तुळशीबाग गणपती व केसरी गणपती या पुण्यातील मानाच्या पहिल्या पाच गणपतींचे दर्शन घेण्यासाठी भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी ट्रॉफिकमुळे कार्यकर्त्यांसह दुचाकीवर प्रवास केला.

# पुणे महापालिकेचा अजब कारभार!

## करार न करताच 82 ठिकाणी चार्जिंग स्थानके

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पर्यावरणपूरक ई-वाहनांसाठी महापालिकेने ई-चार्जिंग स्थानके उभारण्याचे निश्चित केले आहे. त्यासाठी ८२ ठिकाणी चार्जिंग स्थानके उभाण्याचा प्रस्तावाला मंजुरी दिली आहे. मात्र, त्यासंदर्भातील करार महापालिकेने ठेकेदाराबरोबर केला नसल्याचे पुढे आले आहे. त्यानंतरही हव्या त्या मोक्याच्या जागा महापालिकेकडून ठेकेदाराला देण्याचा घाट घालण्यात आला आहे.**

शहरातील ई-वाहनांची संख्या मोठ्या प्रमाणावर वाढत आहे. त्यामुळे ई-चार्जिंग स्थानके उभारण्याचे धोरण महापालिकेने स्वीकारले आहे. त्यानुसार शहरात ८२ ठिकाणी चार्जिंग स्थानके उभारण्यात येणार आहेत. त्या प्रस्तावाला मंजुरी मिळाली आहे. प्रस्तावाला मंजुरी मिळाल्यानंतर महापालिकेने संबंधित ठेकेदाराला कार्य आदेशही दिला आहे.

त्यानंतरही मोक्याच्या जागा ठेकेदाराला देण्याचा घाट महापालिका घालत आहे. उद्यान, क्षेत्रीय कार्यालय, नाट्यगृह, रुग्णालय, वाहनतळ येथे चार्जिंग स्थानके उभारण्यासाठी महापालिकेने निविदा काढली होती. या निविदेमध्ये संबंधित कंपनीला मोक्याच्या जागा आठ वर्षांसाठी विनामूल्य वापरता येतील. ठेकेदाराला मिळणाऱ्या नफ्यापैकी ५० टक्के हिस्सा महापालिकेला मिळेल. चार्जिंगसाठी यंत्रसामग्री, मोबाईल ॲप्लिकेशन, वीज मीटर घेणे, विद्युत देयकाची रक्कम भरणे चार्जिंग स्थानके सुरू ठेवणे, अशा अटी आहेत. तसेच ठेकेदाराकडून महापालिकेकडे २५ लाख रुपये बँक हमी घेणे यासह इतर अटी आहेत.



### मोक्याच्या जागा ठेकेदाराला देण्याचा घाट

» शहरातील ई-वाहनांची संख्या मोठ्या प्रमाणावर वाढत आहे. त्यामुळे ई-चार्जिंग स्थानके उभारण्याचे धोरण महापालिकेने स्वीकारले आहे. त्यानुसार शहरात ८२ ठिकाणी चार्जिंग स्थानके उभारण्यात येणार आहेत. त्या प्रस्तावाला मंजुरी मिळाली आहे. प्रस्तावाला मंजुरी मिळाल्यानंतर महापालिकेने संबंधित ठेकेदाराला कार्य आदेशही दिला आहे. मात्र प्रस्तावानुसार करार केला नसल्याचे पुढे आले आहे. त्यानंतरही मोक्याच्या जागा ठेकेदाराला देण्याचा घाट महापालिका घालत आहे.

# मेट्रोचे काम २०२५ पर्यंत पूर्ण करण्याचे आव्हान!

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

हिंजवडीतील माहिती-तंत्रज्ञान (आयटी) केंद्राला शिवाजीनगरच्या मध्यवर्ती केंद्राशी जोडणाऱ्या पुणेरी मेट्रो प्रकल्पाच्या कामाने वेग पकडला आहे. मागील १४ महिन्यांत या प्रकल्पाचे सुमारे ४५ टक्के काम पूर्ण झाले आहे. उरलेले काम मार्च २०२५ पर्यंत १८ महिन्यांत पूर्ण करण्याचे आव्हान आहे.

या मार्गिकेसाठीच्या चार हजार सेगमेंटची उभारणी पूर्ण करण्यात आली असून, ८० टक्के खांबाची उभारणीही पूर्ण झाली आहे. हिंजवडी ते शिवाजीनगर मार्गावरील पुणे मेट्रो मार्ग ३ चे काम पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून (पीएमआरडीए) सार्वजनिक-खासगी भागीदारी (पीपीपी) तत्त्वावर टाटा समूहाने हाती घेतले आहे. त्याच्या कार्यान्वयासाठी पुणे आयटी सिटी मेट्रो रेल लिमिटेड या स्पेशल पर्पज व्हेईकल (एसपीव्ही) कंपनीची स्थापना करण्यात आलेली आहे.

या प्रकल्पाला पुणेरी मेट्रो असे नाव देण्यात आले आहे. या प्रकल्पासाठीचे भूसंपादन पूर्ण झाले असून, मेट्रो मार्ग उभारणीचे काम वेगाने सुरू आहे. प्रकल्प पूर्ण होण्याची मुदत मार्च २०२५ आहे. त्यामुळे आगामी काळात मेट्रो मार्गांची उभारणी, गणेश खिंड रस्त्यावरील दुमजली उड्डाणपूल आणि मेट्रो स्थानकांचे काम करण्याचे आव्हान आहे. आतापर्यंत या मेट्रो मार्गाच्या ८० टक्के खांबाची उभारणी पूर्ण झाली आहे.

# संसारात संकटांचा सामना करावाच लागेल!

## पंडित प्रदीप मिश्राः आधी 14 वर्षे वनवास मग घडले प्रभू श्रीराम; हेच जीवनाचे सार!

### रेकॉर्ड ब्रेक गर्दीने श्री अष्टविनायक शिवमहापुराण कथेचा समारोप

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**"संसारात जन्म घेतला की, वाट्याला येणारे दुःख तुम्हाला भोगावेच लागणार आहेत. प्रभू श्रीराम, श्रीकृष्ण, संत तुकाराम, संत ज्ञानेश्वर यांच्या वाट्याला आलेल्या दुःखापासून ते चुकले नाहीत. दुःख पचवून पुन्हा उभे राहण्याची क्षमता असल्यानेच त्यांनी संघर्ष केला. त्यामुळेच त्यांना देवपद, संतपद प्राप्त झाले. भगवान राम यांनी १४ वर्षे वनवास भोगल्यानंतरच ते 'प्रभू श्रीराम' होवू शकले. कठिण प्रसंगातून गेल्याशिवाय कुणालाही देवपद, संतपद मिळत नाही, असा विचार आंतरराष्ट्रीय ख्यातीचे कथा वाचक पंडित प्रदीप मिश्रा यांनी दिला.**









लोकनेते लक्ष्मणभाऊ जगताप मित्र परिवाराच्या वतीने सांगवी येथील पीडब्ल्यूडी मैदानावर 'श्री अष्टविनायक शिव महापुराण कथा वाचन" सोहळा आयोजित करण्यात आला होता. लाखो भाविकांच्या उपस्थितीत सोहळ्याची आज सांगता करण्यात आली. पिंपरी-चिंचवड भारतीय जनता पार्टीचे शहराध्यक्ष शंकर जगताप या कार्यक्रमाचे मुख्य निमंत्रक आहेत.

सोहळ्याच्या सांगता समारोहाच्या निमित्ताने भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, प्रदेश सरचिटणीस मुरलीधर मोहोळ व विक्रांत पाटील, भाजपा प्रवक्ते संदीप खर्डेकर, पिंपरी-चिंचवड प्रभारी ॲड. वर्षा डहाळे, पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे, पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, सेवानिवृत उपजिल्हाधिकारी सुखदेव बनकर, मारुतराव साळुंखे, माजी महापौर दत्तात्रय गायकवाड, पुणे मनपा स्थायी समितीचे माजी अध्यक्ष विशाल तांबे, माजी नगरसेविका मंजुश्री खर्डेकर, हभप पंकज महाराज गावडे, हभप नितीन महाराज गोरे, संत तुकाराम महाराज संस्थान देहूचे अध्यक्ष हभप पुरुषोत्तम महाराज मोरे, विश्वस्त भानुदास महाराज मोरे, माणिक महाराज मोरे यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवरांनी कथा श्रवण केले.

"कोणाचे चांगले करू शकत नसाल, तर वाईटही करू नका. आपल्याकडून चांगले घडावे यासाठी प्रयत्नशील रहा. तो असा वागतो, म्हणून मी देखील असाच वागणार, अशा प्रकारचे वागणे टाळणे गरजेचे आहे. स्वतःची तुलना इतराशी करण्याचा प्रयत्न टाळा, यामुळे दुसऱ्यासारखे वागण्याचा प्रयत्न करताना तुम्ही स्वतःचा देखील आनंद गमावून बसाल, असे पं. प्रदीम मिश्रा यांनी यावेळी सांगितले.

### लक्ष्मणभाऊ जगताप यांची पुण्याई ...

लोकनेते लक्ष्मण जगताप आज आपल्यात नसले तरी त्यांची पुण्याई आपल्यासोबत आहे. त्याच पुण्याईने शिवमहापुराण कथेचे आयोजन करण्यासाठी जगताप कुटुंबियांना प्रोत्साहित केले. कथा सोहळ्याचे आयोजन ही सहज शक्य गोष्ट नसली, तरी केवळ कर्मच अशा गोष्टी घडविण्यासाठी पाठबळ देते. लक्ष्मणभाऊंची पुण्याई आजही जगताप कुटुंबियांच्या पाठीशी आहे, म्हणूनच त्यांच्या वतीने आयोजित सोहळ्याचा लाभ लाखो नागरिक घेवू शकले आहेत. असे म्हणत पं. प्रदीपजी मिश्रा यांनी जगताप कुटुंबियांचे मनापासून कौतुक केले.

### रेकॉर्ड ब्रेक' गर्दीचा सर्वात मोठा सोहळा...

**'गेल्या ७ दिवसांपासून सुरु असलेल्या सोहळ्याच्या प्रत्येक दिवशी भाविकांनी रेकोर्डब्रेक गर्दी केली होती. प्रत्येक दिवशी सुमारे अडीच लाख भाविकांनी या कथा श्रावणाचा आस्वाद घेतला. या ७ दिवसांत सुमारे १८ लाख भाविक प्रत्यक्ष सभामंडपात कथा श्रवणासाठी उपस्थित होते. याबरोबरीने सोशल मिडीयाच्या माध्यमातून देखील कोट्यवधी नागरीकांनी या कथेचा आस्वाद घेतला.**

**सोहळ्याचे मुख्य संयोजक शंकर जगताप यांनी सर्व भाविक, साधक आणि पंडित मिश्रा यांचे अनुयायी यांचे आभार मानले. कोणताही अनुचित प्रकार न घडता गर्दीचा उच्चांक मोडीत काढणारा हा पिंपरी-चिंचवडसह महाराष्ट्रातील सर्वात मोठा शिवपुराण कथा वाचन सोहळा ठरला. अत्यंत भक्तीमय वातावरणात सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. याबद्दल भाविकांनीही समाधान व्यक्त केले.**

### 'कथेचा प्रभाव दीर्घकाळ टिकणारा...

**शिवकथा हे जीवनाचे सार आहे. यातून मिळणाऱ्या सकारात्मक संदेशाने आपले जीवन व्यतीत करण्याचा प्रयत्न करा. शिवमहापुराण कथा पं. प्रदीपजी मिश्रा यांच्या वाणीतून ऐकताना आपण मंत्रमुग्ध होवून जातो. या कथेचा प्रभाव हा दीर्घकाळ टिकणारा आहे. शिवाला आणि शिवकथेला आपल्या मनात ठेवा आणि शिवकथेत दाखविलेल्या मार्गावर मार्गस्थ व्हा, असे आवाहन भारतीय जनता पक्षाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी यावेळी बोलताना केले.**

### आपली रुची असणाऱ्या देवाचे नामस्मरण करा...

**नामस्मरण कशाचे आणि कुणाचे करावे? हे ज्याने त्याने ठरवावे. तुम्ही कशा प्रकारे नामस्मरण करावे, हे कोणत्याही संत महात्म्याने सांगितलेले नाही. तुम्हाला आवडणारे नामस्मरण करा, ज्यातून तुम्हाला सर्व देवांचे स्मरण झाल्याशिवाय राहणार नाही, असा अध्यात्मिक सल्ला देखील यावेळी पं. प्रदीप मिश्रा यांनी दिला.**



भूमिका

**आरक्षण हवेच, पण मराठा वा पटेल यांसारखे समाजघटक आरक्षणाची मागणी का करू लागले हे समजून घ्यायला हवे आणि ज्या सार्वजनिक क्षेत्रातील नोकऱ्यांत आरक्षण लागू करायचे, त्याच्या स्थितीकडेही लक्ष हवे..**

# तिढा आरक्षणाचा नसून बेरोजगारीचा!

महाराष्ट्रात पुन्हा एकदा आरक्षणाच्या मुद्द्यावरून वातावरण तापत आहे. धनगर आरक्षणाचा मुद्दा असो की मराठवाड्यातील मराठा समाजाला 'कुणबी' जातीचे प्रमाणपत्र देऊन ओबीसी कोटय़ातून आरक्षण मिळवून देण्याचा मुद्दा आणि याविरोधात संघर्षांची भूमिका घेतलेला ओबीसी समाज असो. फक्त महाराष्ट्रातच नाही तर देशातील इतर राज्यांतही गेल्या काही काळात आरक्षणाच्या मुद्दय़ावरून आंदोलने, संघर्ष झालेला आहे. त्याविषयी लिहिण्यापूर्वी हे स्पष्ट केले पाहिजे की, आरक्षण धोरणाला प्रस्तुत लेखकाचे समर्थनच आहे. त्यामुळे सांविधानिक मार्गाने आंदोलन करणाऱ्या कार्यकर्त्यांचेही समर्थनच! प्रत्येक समाजाला त्याच्या लोकसंख्येच्या प्रमाणात प्रतिनिधित्व मिळालेच पाहिजे. त्यातही अर्धा हिस्सा महिलांना मिळाला पाहिजे. त्यामुळे आरक्षण मिळवण्यासाठी, वाचवण्यासाठी, आरक्षणाची मर्यादा वाढवण्यासाठी सांविधानिक, लोकशाही मार्गाने प्रयत्नशील राहिले पाहिजे. पण फक्त आरक्षण मिळाल्याने हा प्रश्न सुटणार आहे का? नाही, हेच याचे उत्तर. कारण आरक्षणासाठी



वाढत्या संघर्षांच्या मुळाशी समाजात वाढत चाललेली बेरोजगारी आहे. त्यामुळे प्रथम आपल्याला बेरोजगारीची कारणे समजून घ्यावी लागतील. बेरोजगारीच्या संकटाचे पहिले कारण म्हणजे भारतातील छोटय़ा शेतकऱ्याचे धोरण आखून नियोजित पद्धतीने चालवले जाणारे खच्चीकरण आहे. भारत सरकारची सल्लागार संस्था निती आयोगाच्या दस्ताऐवजामध्ये नमूद केले आहे की 'कॉर्पोरेट क्षेत्र शेती क्षेत्रात गुंतवणूक करण्यास उत्सुक आहे, मात्र त्यांच्या मार्गातील अडथळा आहे इथली छोटी शेती'. याचा अन्वयार्थ असा की, धोरण आखून इथला छोटा शेतकरी संपवून त्याची शेती कॉर्पोरेट्सच्या हवाली करण्याचे नियोजन आहे. याचाच भाग म्हणून तीन कृषी कायदे आणले गेले होते. याविषयी अलीकडेच 'द रिपोर्टर्स कलेक्टिव्ह'ने उघडकीसदेखील आणले की, तीन कृषी कायदे तयार करताना सरकारने शेतकरी संघटनांशी नाही तर कृषी क्षेत्रातील मोठय़ा कंपन्यांशी सल्लामसलत केली होती. हे खच्चीकरण गेल्या तीन दशकांपासून चालले आहे. सध्याच्या सरकारच्या काळात त्याचा वेग आणखी वाढला आहे. याचाच परिणाम असा की, पहिल्यांदाच कृषी क्षेत्रातील रोजगार घटले आहेत. ही कबुली केंद्र सरकारनेच 'कृषी उत्पन्न दुप्पट करण्यासाठी' जी समिती नेमली तिच्या २०१७ पासून धूळ खात पडलेल्या अहवालातून मिळते. सन १९८१ ते ९१ या दशकात शेतीतून रोजगार मिळवणाऱ्यांमध्ये २.३ टक्क्यांची सरासरी वार्षिक वाढ होऊन १९९१ मध्ये देशात १७.५३ कोटी शेतकरी व शेतमजूर होते, त्यापुढल्या दशकातील सरासरी वार्षिक वाढ २.४ टक्के या दराने होऊन २००१ पर्यंत २३.४१ कोटी स्त्री-पुरुषांना शेतीतून रोजगार मिळाला, परंतु २००१ ते २०११ या दशकातील वार्षिक वाढ १.२ एवढय़ाच दराने झाल्यामुळे २६.३० कोटी जणांना शेतीतून रोजगार मिळाला. 'केंद्रीय कृषी अभियांत्रिकी संस्थे'तील तज्ज्ञ एल. पी. गीते यांनी २०१७ मध्ये केलेल्या गणनेनुसार, २०२० पर्यंत शेतीतून रोजगार मिळवू शकणाऱ्यांची संख्या पुन्हा घसरेल आणि २३ कोटींपर्यंत राहील. हे भाकीत तंतोतंत खरे ठरल्याची कबुली २०२२-२३ च्या केंद्रीय अर्थसंकल्पाआधी सादर झालेल्या आर्थिक पाहणी अहवालाने दिली आहे. हे काही निव्वळ कागदावरील आकडे नाहीत- शेतीतून समाधानकारकरीत्या रोजगार मिळेनासा झाला म्हणूनच ही घट होते आहे. पारंपरिकरीत्या शेतीवर अवलंबून असलेल्या महाराष्ट्रातील मराठा, गुजरातमधील पटेल समाजांच्या आरक्षणाच्या मागणीमागे ही घसरण हे एक प्रमुख कारण आहे. शेतकऱ्यांची मुले घरचा शेती व्यवसाय सोडून सरकारी नोकरी मिळवण्यासाठी स्पर्धा परीक्षांच्या तयारीसाठी, सरकारी अथवा खासगी क्षेत्रातील नोकरीसाठी मोठय़ा प्रमाणात शहरांकडे येत आहेत. पण शहरांतही रोजगाराच्या संधी कमी होत आहेत. खासगी क्षेत्राबाबतीत नोटाबंदी आणि चुकीच्या जीएसटीमुळे छोटे उद्योग मोठय़ा प्रमाणावर बंद पडले, मूठभर मोठय़ा उद्योगांच्या हाती या क्षेत्राचे केंद्रीकरण होत आहे. हे बेरोजगारीचे दुसरे प्रमुख कारण. त्यामुळे खासगी क्षेत्रात सन्मानजनक म्हणाव्या अशा नोकऱ्यांच्या संधी दिवसेंदिवस घटत चालल्या आहेत. आयटी क्षेत्र वगळता इतर क्षेत्रांत चांगल्या नोकरीची संधी कमी झाली आहे.

## संपादकीय »

# करकोचा आणि खीर!

***लोकसंख्येत जवळपास ५० टक्के इतक्या संख्येने असलेल्या महिलांना ताजे विधेयक ३३ टक्के आरक्षण देऊ पाहते. आहे त्यांनाच पुन्हा काही द्यावे हा आरक्षणाचा हेतू कधीच नसतो.***

सुमारे ३६ वर्षांपूर्वी पहिल्यांदा राजीव गांधी यांनी प्रस्तावित केलेले, नंतर नरसिंह राव यांनी ज्यासाठी आवश्यक घटनादुरुस्ती केली ते, देवेगौडा यांनी पंतप्रधानपदाच्या काळात जे प्रत्यक्ष सादर केले ते, इंदरकुमार गुजराल यांनी आपल्या अल्पकालीन सरकारच्या काळात ज्यासाठी प्रयत्न केले ते, पंतप्रधानपदी अटलबिहारी वाजपेयी असताना ममता बॅनर्जी आणि सुमित्रा महाजन यांनी ज्याचा आग्रह धरला होता ते भाजपच्या समाजमाध्यमी गणंगांनी ज्यास एके काळी हिणकस शब्दांत विरोध नोंदवला होता ते महिलांना आरक्षणाचा अधिकार देणारे विधेयक मणिपुरातील महिलांची अवहेलना, महिला कुस्तीगिरांची विटंबना, उनाव, हाथरस इत्यादी ठिकाणी स्त्रियांवरील अत्याचार प्रकरणांत सत्ताधाऱ्यांची पुरती शोभा झाल्यानंतर अखेर नरेंद्र मोदी सरकारने लोकसभेत सादर केले.

**राज्यातील १४२ नद्यांतील गाळ काढण्याचे धोरण निश्चित करण्यासाठी दीर्घकालीन योजना आखल्याचे वृत्त वाचले. यापूर्वीही अशी घोषणा करण्यात आली होती. शासनाने राज्यातील सर्व जलाशय ज्यात धरण, पाझर तलाव, तलाव, वाहते पाणी प्रवाह, नद्या, नाले ओढे यातील गाळ दरवर्षी काढण्याबाबत एकच धोरणात्मक निर्णय घेऊन त्याची सर्व स्तरांवर अमलबजावणी करावी.**

# पाणीटंचाई टाळायची तर जलाशयांतील गाळ काढाच!

त्याचबरोबर सांडपाणी आणि औद्योगिक वसाहतींतील सांडपणी कोणतीही प्रक्रिया न करता नद्यांमध्ये सोडले जाते त्यास कायद्याने पूर्ण आळा घालणे आवश्यक आहे. पाण्याच्या वाढत्या मागणीस हे गाळाने भरलेले जलाशय पुरेसे पडणार नाहीत हे वास्तव आहे. पाणी पुरवठ्यासाठी टँकरचा वापर मोठ्या प्रमाणात होत आहे आणि त्यातून आर्थिक गैरव्यवहार होणे हे तर नेहमीचेच आहे. धरणातील/ जलाशयातील पाणीसाठा कमी होण्याचे प्रमुख कारण आहे- दरवर्षी पाण्याबरोबर मोठ्या प्रमाणात वाहून येणारा गाळ. नद्यांतून वाहून येणारा हा गाळ धरणांच्या भिंतींजवळ साठतो.

परिणामी धरणाची पाणी साठवण क्षमता कमी होते. ही प्रक्रिया कित्येक वर्षे सातत्याने घडत आहे आणि वर्षानुवर्षांचा गाळ धरणांत साठत आहे. यासाठी एक प्रभावी उपाय म्हणजे धरणातील/ जलाशयातील गाळ दरवर्षी काढणे. त्यासाठी आता आधुनिक आणि प्रभावी तंत्रज्ञानही उपलब्ध आहे. काढलेला



गाळ शेतकरी, कुंभार यांन देऊन त्यातून अर्थिक लाभही मिळवता येईल. पावसाळा संपल्यावर साठवण क्षेत्रातील गाळ काढण्यास सुरुवात करणे ऑक्टोबर/ नोव्हेंबरमध्ये आरंभ करून मे महिन्याच्या मध्यापर्यंत हे काम पूर्ण करणे उपयुक्त ठरू शकते.

सातत्याने आणि दरवर्षी हा उपक्रम राबविल्यास खोली वाढवल्याने पाण्याची साठवण क्षमताही वाढेल आणि तरीही धरणातील पाण्याच्या पातळीत वाढ न होता, ती दरवर्षीप्रमाणचे राहील. सटाळे ग्रामस्थांनी राबवलेल्या उपक्रमाचे गावोगावी अनुकरण झाल्यास पाणी टंचाईवर कायमची मात करता येईल. नांदगाव तालुक्यातील सटाळे येथील १९७२ च्या भीषण दुष्काळात काळात बांधलेला पाझर तलाव गेली ४२ वर्षे दुर्लक्षित होता. गाळाने पूर्णपणे भरला होता. अंकाई डोंगराच्या उतारावरून येणारे पाणी आडकाठी नसल्याने वाहून जाणारे पाणी अडवून वाड्या वस्त्यांना दुष्काळाच्या तावडीतून मुक्त करण्याचा गावाने एकमुखी निर्णय घेतला. त्याची महसूल खात्याला कल्पना दिली.

सरपंच अरुणाबाई गंगाधर माळुंगे यांच्या पुढाकारातून गावातील एक हजार हातांनी टप्प्याटप्प्याने पाझर तलावातील गाळ काढण्यास सुरुवात केली. काम मोठे असल्याने महसूल खात्याने यंत्रसामुग्रीची जोड मिळवून दिली. पाझर तलावातील एक लाख ३५ हजार ब्रास म्हणजेच तीन लाख २६ हजार ७०० घनमीटर क्षेत्रावरील गाळ उपसण्यात आला. हा गाळ शेतकऱ्यांना मोफत देण्याचा निर्णय घेतल्याने जवळपास ४६५ एकर जमीन सुपीक झाली. येत्या पावसाळ्यात पाण्याचा थेंब अन् थेंब अडविला जात आहे. गाळ काढल्याने तलावाच्या पाणी साठवणक्षमतेत फार मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे, तीही पाण्याची पातळी न वाढता.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# विधानसभा अध्यक्ष लागले कामाला!

## » सुप्रीम कोर्टाच्या दणक्यानंतर नार्वेकर दिल्लीला रवाना

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**सर्वोच्च न्यायालयाने शिवसेना आमदारांच्या अपात्रतेच्या मुद्यावर आठवड्याभरात सुनावणी घेऊन प्रगती अहवाल सादर करण्याचे निर्देश दिल्यानंतर विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर कामाला लागलेत. नार्वेकर गुरुवारी तातडीने दिल्लीला जावून कायदेतज्ज्ञांशी चर्चा करणार आहेत.**

त्यामुळे राज्याच्या राजकारणात नार्वेकर कुणाला भेटणार? दिल्लीत कोणती सल्लामसलत होणार? व पुढील आठवडा चांगलाच गाजणार असल्याची गरमागरम चर्चा रंगली आहे. शिवसेना आमदार संजय शिरसाट यांनी राहुल नार्वेकर आपल्या दिल्ली दौऱ्यात ज्येष्ठ कायदे तज्ज्ञांशी चर्चा करणार असल्याचे सांगितले आहे. तर सूत्रांनी कायदे तज्ज्ञांशी चर्चा केल्यानंतर ते आमदार अपात्रतेसंबंधीचा आपला निर्णय देतील असा दावा केला आहे. त्यामुळे त्यांच्या या दौऱ्याकडे सर्वांचेच लक्ष लागले आहे. नार्वेकर यांचा हा दौरा पूर्वनियोजित असल्याचाही दावा केला जात आहे. दुसरीकडे, नार्वेकर पुढील 1-2 दिवसांत अपात्रतेशी संबंधित सुनावणीसाठी शिवसेना (ठाकरे) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे व मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना नोटीस बजावणार असल्याची माहिती आहे. त्यानुसार ते आठवड्याभरात हा मुद्दा निकाली काढण्याच्या विचारात असल्याचा दावाही केला जात आहे. यामुळे पुढील काही दिवसांत राज्याच्या राजकारणात मोठ्या घडामोडी घडण्याची शक्यता आहे.

शिवसेनेच्या सत्ताधारी शिंदे गटाचे आमदार संजय शिरसाट यांनी आमदार अपात्रतेच्या मुद्यावर आपल्या पक्षाची बाजू बळकट असल्याचा दावा केला आहे. आम्हाला पुढील एक-दोन दिवसांत नोटीस मिळण्याची शक्यताआहे. आम्ही त्याला उत्तर देऊ. आमची बाजू दुबळी नाही तर भक्कम आहे, असे ते म्हणाले. संजय शिरसाट पुढे म्हणाले की, विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर कायदे तज्ज्ञांशी चर्चा करण्यासाठी दिल्लीला जात आहेत. ते त्यांच्या निर्देशांनुसार आपली कारवाई करतील. यापूर्वी त्यांनी 2 आठवड्यांची मुदत दिली होती. पण सध्या थोडीशी घाई आहे. पण या प्रकरणी कोर्टाच्या आदेशाचे पालन केले जाईल.



### ठाकरे - शिंदेंना बजावणार नोटीस

» सूत्रांनी कायदे तज्ज्ञांशी चर्चा केल्यानंतर ते आमदार अपात्रतेसंबंधीचा आपला निर्णय देतील असा दावा केला आहे. या दौऱ्याकडे सर्वांचेच लक्ष लागले आहे. नार्वेकर यांचा हा दौरा पूर्वनियोजित असल्याचाही दावा केला जात आहे. दुसरीकडे, नार्वेकर पुढील 1-2 दिवसांत अपात्रतेशी संबंधित सुनावणीसाठी शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे व मुख्यमंत्री शिंदे यांना नोटीस बजावणार असल्याची माहिती आहे. आठवड्याभरात हा मुद्दा निकाली काढण्याच्या विचारात असल्याचा दावाही केला जात आहे.

# जरांगे पाटील यांना रुग्णालयातून डिस्चार्ज

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

आंतरवाली सराटी (ता. अंबड) येथे मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे पाटील यांनी 29 ऑगस्ट ते 14 सप्टेंबरदरम्यान बेमुदत उपोषण केले. सलग 17 दिवसांनंतर त्यांनी उपोषण मागे घेत साखळी उपोषणाची घोषणा केली होती. मात्र, अशक्तपणा आल्यानंतर त्यांना रविवारी (ता. 17 रोजी) रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. चार दिवसांच्या उपचारानंतर त्यांना गुरुवारी डिस्चार्ज देण्यात आला. या उपचारानंतर जरांगे पाटील थेट जालन्याच्या आंतरवाली सराटीत जाऊन पुन्हा एकदा साखळी उपोषण करणार आहेत. मनोज जरांगे यांनी मराठा आरक्षणासाठी उग्र आंदोलन सुरू केले होते. मात्र, उपोषणादरम्यान पोलिसांनी आंदोलकांवर लाठीचार्ज केल्यामुळे हे आंदोलन चिघळून महाराष्ट्रभर याचे पडसाद उमटले. या लाठीहल्ल्याप्रकरणी टीकेची चौफेर झोड उठल्यानंतर सरकारने मनोज जरांगे पाटील यांच्याशी चर्चा सुरू करून चार ते पाच बैठका निष्फळ ठरल्या आहेत. यानंतर मुंबईच्या बैठकीनंतर सरकारने मराठवाड्यातील मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र देऊन त्यांना आरक्षणाचा लाभ देण्याची तयारी दर्शवली, पण यासंबंधीच्या जीआरमध्ये त्यांनी वंशावळीची अट टाकली. या अटीवर जरांगे पाटील यांनी हरकत घेतल्यामुळे त्यांची सरकारसोबतची चर्चा निष्फळ ठरली. त्यांनी सरकारला आरक्षण देण्यासाठी महिन्याभराची मुदत दिली आहे. अशक्तपणा जाणवू लागल्याने जरांगे पाटील यांना छत्रपती संभाजीनगर येथील गॅलेक्सी रुग्णालयात 4 दिवसांपासून उपचार सुरू होते. त्यांना गुरुवारी डिस्चार्ज दिल्यानंतर ते शासकीय रुग्णवाहिकेतून थेट उपोषणस्थळाकडे रवाना झाले. मनोज जरांगे यांचे आंतरवाली सराटीत साखळी उपोषण सुरू राहणार आहे. सरकारला दिलेल्या महिनाभराच्या मुदतीत आरक्षणाची मागणी पूर्ण झाली नाही तर ते पुन्हा उपोषणाचे हत्यार उपसून सरकारविरोधात दंड थोपटणार आहेत.

# आदिवासी समाजाला दिला जाणारा सर्व लाभ धनगर समाजालाही द्यावा : मुख्यमंत्री

## » 10 हजार कोटी रुपयांची शासनाने केली तरतूद

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**मराठा आरक्षणानंतर धनगर आरक्षणावरून महाराष्ट्रातील राजकीय वातावरण तापले आहे. धनगर समाजाला एसटी प्रवर्गाचे दाखला द्यावा, या मागणीसाठी राज्यात विविध ठिकाणी धनगर समाजाकडून आंदोलन केले जात आहे. धनगर आरक्षणाबाबत चर्चा करण्यासाठी आज सह्याद्री अतिथीगृहात बैठक पार पडली. या बैठकीनंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधला.**

ही बैठक सकारात्मक झाली. जोपर्यंत हा निर्णय होत नाही, तोपर्यंत आदिवासी समाजाला दिला जाणारा सर्व लाभ धनगर समाजालाही द्यावा, असा निर्णय या बैठकीत घेण्यात आला, अशी माहिती मुख्यमंत्री शिंदे यांनी दिली. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, धनगर आरक्षणाबाबत शासन सकारात्मक आहे. शासन घाईगडबडीत निर्णय घेऊ इच्छित नाही. न्यायालयात देखील टिकू शकेल असे आरक्षण धनगर समाजास देण्याची आमची भूमिका आहे. मध्य प्रदेश, बिहार आणि तेलंगणा या राज्यात शासन निर्णय काढून काही समाजांना जात प्रमाणपत्र उपलब्ध करुन देण्यात आले आहेत. त्या राज्यांच्या कार्यपद्धतीचा अभ्यास करण्यासाठी धनगर समाजबांधवांच्या प्रतिनिधीसह शासकीय शिष्टमंडळ पाठविण्यात येईल. या शिष्टमंडळाचा अहवाल देशाचे ॲटर्नी जनरल यांच्याकडे पाठवून राज्य शासनाच्या पातळीवर त्याप्रमाणे निर्णय घेण्याबाबत मार्गदर्शन घेण्यात येईल, असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले. देवेंद्र फडणवीस म्हणाले की, सरकार धनगर समाज आरक्षणाच्या बाबतीत संवेदनशील आहे. हा प्रश्न सुटला पाहिजे हा आमचा प्रयत्न आहे. यासाठीच आरक्षण मिळण्यापूर्वी टीआयएसएसच्या अहवालाच्या आधारे धनगर समाजाला आदिवासी बांधवांच्या धर्तीवर योजनांचा लाभ देण्यात आला. त्यासाठी 10 हजार कोटी रुपयांची तरतूद शासनाने केली आहे. उच्च न्यायालयात देखील धनगर समाजाच्या मागणीला पूरक भूमिका शासनाने घेतली आहे. परंतु संविधानाने सांगितलेल्या तांत्रिक प्रक्रियेशिवाय आरक्षण मिळणे शक्य नाही.



### आरक्षण देण्याची आमची भूमिका

» धनगर आरक्षणाबाबत शासन सकारात्मक आहे. शासन घाईगडबडीत निर्णय घेऊ इच्छित नाही. न्यायालयात देखील टिकू शकेल असे आरक्षण धनगर समाजास देण्याची आमची भूमिका आहे. मध्य प्रदेश, बिहार आणि तेलंगणा या राज्यात शासन निर्णय काढून काही समाजांना जात प्रमाणपत्र उपलब्ध करुन देण्यात आले आहेत. त्या राज्यांच्या कार्यपद्धतीचा अभ्यास करण्यासाठी धनगर समाजबांधवांच्या प्रतिनिधीसह शासकीय शिष्टमंडळ पाठविण्यात येईल.

# महिला आरक्षण तत्काळ लागू करा!

## » विरोधकांना सरकार चालवता आले नाही : जेपी नड्डा

| नवी दिल्ली |

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**संसदेच्या विशेष अधिवेशनाच्या चौथ्या दिवशी राज्यसभेत महिला आरक्षण विधेयकावर (नारीशक्ती वंदन विधेयक) चर्चा सुरू आहे. अर्जुनराम मेघवाल यांनी सर्वप्रथम विधेयक मांडले. यानंतर काँग्रेसच्या खासदार रंजीत रंजन यांनी चर्चेला सुरुवात केली. त्यांनी विधेयकाच्या नावावर आक्षेप घेत महिलांना सन्मानाची नाही तर समानतेची गरज असल्याचे सांगितले.**

यानंतर भाजप अध्यक्ष जेपी नड्डा यांनी विचार मांडले. ते म्हणाले- हे विधेयक महिलांवर उपकार नाही, तर त्यांना नमन आणि अभिनंदन आहे. जर हे विधेयक आज मंजूर झाले तर 2029 पर्यंत 33% महिला खासदार होतील. त्याचवेळी खर्गे यांनी कबीर यांच्या 'काल करे सो, आज कर' या दोह्याचे पठण करत आरक्षणाची तातडीने अंमलबजावणी करण्याची मागणी केली. जेपी नड्डा यांनी प्रत्युत्तर दिले की, भाजपचा उद्देश राजकीय फायदा घेणे नाही. सरकार नियमानुसार काम करते आणि ठोस काम करण्यावर विश्वास ठेवते. यावर विरोधी खासदारांनी 'नाही' म्हणायला सुरुवात केल्यावर नड्डा म्हणाले की, 'नाही' म्हणणाऱ्यांना राज्य कसे करायचे हेच कळत नाही. जर तुम्हाला शासन कसे करावे हे माहिती असेल तर तुम्हाला नियम आणि कायदे ही देखील असतात हे कसे समजणार. राहुल गांधींवर निशाणा साधत ते म्हणाले की, जे चांदीचा चमचा तोंडी घेऊन जन्माला येतात त्यांना गरिबांच्या समस्या कळत नाहीत. नेता हा नेता व्हायला हवा, शिकवलेली विधाने करून चालत नाही. सकाळी 11 वाजता लोकसभेचे कामकाज सुरू झाले तेव्हा पंतप्रधान नरेंद्र मोदी बोलण्यासाठी सर्वप्रथम उभे राहिले. भारताच्या संसदीय प्रवासातील हा सुवर्ण क्षण असल्याचे ते म्हणाले. या सभागृहातील सर्व सदस्य त्या क्षणाला पात्र आहेत. सर्व संघाचे सदस्य आहेत. त्यात सर्व पक्षांचे नेतेही आहेत. सभागृहात असो वा सभागृहाबाहेर, त्यांना समान अधिकार आहेत. ते म्हणाले, 'आजच्या या अत्यंत महत्त्वाच्या निर्णयासाठी आणि देशाच्या मातृशक्तीमध्ये नवीन ऊर्जा संचारण्यासाठी मी वचनबद्ध आहे, उद्याचा निर्णय आणि आज राज्यसभेनंतर आम्ही शेवटचा टप्पा कधी पूर्ण करू. हे पवित्र कार्य पार पाडण्यासाठी तुम्ही सर्वांनी योगदान दिले आहे, पाठिंबा दिला आहे आणि अर्थपूर्ण चर्चा केली आहे. सभागृह नेता या नात्याने आज मी तुम्हा सर्वांचे खऱ्या मनाने आदरपूर्वक अभिनंदन करतो. पंतप्रधान मोदींच्या भाषणानंतर लोकसभेत चांद्रयान-3 च्या यशावर चर्चा झाली. लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी या मिशनची माहिती सभागृहाला दिली. यानंतर राजनाथ सिंह बोलायला उभे राहिले. चीनच्या मुद्द्यावर चर्चा करण्याची हिंमत आहे का, असा सवाल काँग्रेस नेते अधीर रंजन चौधरी यांनी राजनाथ यांना केला. यावर राजनाथ सिंह म्हणाले की, माझ्यात पूर्ण हिम्मत आहे, मी चीनशी चर्चा करण्यास तयार आहे आणि छाती रुंद करून चर्चा करण्यास तयार आहे.




### चीनशी चर्चा करण्यास तयार

» कायदा मंत्री अर्जुनराम मेघवाल आज लोकसभेत वकील दुरुस्ती विधेयक 2023 सादर करणार आहेत. राज्यसभेचे सभापती जगदीप धनखड यांनी उपसभापतींच्या पॅनेलची पुनर्रचना केली आहे. यामध्ये 13 महिला खासदारांना स्थान देण्यात आले. खासदार जगदीप धनखड यांच्या अनुपस्थितीत त्या राज्यसभेचे कामकाज चालवणार आहेत. सरकार आज राज्यसभेत रिपीलिंग अँड अमेंडिंग बिल सादर करू शकते. या विधेयकात असे 65 कायदे रद्द करण्याची तरतूद आहे, जे प्रचलित झाले आहेत किंवा इतर कायद्यांमुळे अनावश्यक झाले आहेत. हे विधेयक गेल्या वर्षी जुलैमध्ये लोकसभेत मंजूर झाले होते.

# संसदेच्या जुन्या वास्तूत दोष होता?

## » काँग्रेसचा थेट पंतप्रधान नरेंद्र मोदींना प्रश्न

| नवी दिल्ली |

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**संसदेच्या विशेष अधिवेशनादरम्यान, महिला आरक्षण विधेयक लोकसभेत मंजूर झालं आहे. आता या विधेयकावर राज्यसभेत चर्चा सुरू आहे. या विधेयकाला देभभरातील जवळपास सर्वच पक्षांनी (एमआयएम वगळता) पाठिंबा दर्शवला आहे. काँग्रेसनेही या विधेयकाला पाठिंबा दिला आहे. परंतु, या विधेयकावरून काँग्रेसने पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय मंत्रिमंडळाला काही प्रश्न विचारले आहेत.**

महिला आरक्षणासाठी २०२९ पर्यंत वाट का पाहायची? हे विधेयक भाजपाने गेल्या नऊ वर्षांमध्ये का मांडलं नाही? असे अनेक प्रश्न काँग्रेसने उपस्थित केले आहेत. दरम्यान, काँग्रेस खासदार के. सी. वेणुगोपाल यांनी आज राज्यसभेत मोदी सरकारला धारेवर धरलं. के. सी. वेणुगोपाल म्हणाले, महिला आरक्षण विधेयक सर्वात आधी १९८९ ला लोकसभेत सादर करण्यात आलं होतं. परंतु या विधेयकाला लालकृष्ण अडवाणी, अटल बिहारी वाजपेयी, जसवंत सिंह, राम जेठमलानी या लोकांनी राज्यसभेत विरोध केला. त्यामुळे तेव्हा हे विधेयक पारित होऊ शकलं नाही. २०१० मध्ये आमच्या काँग्रेस सरकारने हे विधेयक राज्यसभेत मंजूर करून घेतलं. परंतु, लोकसभेत मंजूर होऊ शकलं नाही. २०१४ ला तुम्ही सत्तेत आलात. तेव्हा तुम्ही देशातल्या जनतेला आश्वासन दिलं की, तुम्ही लवकरच महिलांना आरक्षण देणार, परंतु, तुम्हाला हे विधेयक आणण्यासाठी साडेनऊ वर्षे का लागली? काँग्रेस नेते के.सी. वेणुगोपाल म्हणाले, तुम्हाला इतकी वर्षे कोणी अडवलं होतं? २०१४ पासून तुम्ही सत्तेत आहात. २०१४ ते २०२३ या ९ वर्षांच्या काळात तुम्ही हे विधेयक का सादर केलं नाही. मला त्याचं कारण जाणून घ्यायचं आहे. मला पंतप्रधानांकडून जाणून घ्यायचंय की साडेनऊ वर्षे का थांबलात? हे विधेयक सादर करण्यासाठी आपले पंतप्रधान इतकी वर्षे संसदेच्या नव्या इमारतीची वाट पाहत होते का? आपल्या संसदेच्या जुन्या वास्तूत काही दोष होता का? हे विधेयक मांडण्यासाठी तुम्ही आत्ताच चांगला मुहूर्त काढला होता का? विधेयक सादर करण्यासाठी तुम्हाला साडेनऊ वर्षे का लागली? आता तुम्ही म्हणताय की याची अंमलबजावणी व्हायला २०२९ पर्यंतच वाट पाहावी लागेल.



### राजकीय गणितांची चाचपणी

» लोकांचं आयुष्य बदलून टाकणारे निर्णय हे सत्ताधाऱ्यांच्या मनातून यायला हवेत, असे निर्णय सत्ताधाऱ्यांच्या मेंदूतून येऊ नयेत. हे विधेयक मांडण्याआधी तुम्ही अनेक राजकीय गणितांची चाचपणी केलेली दिसतेय. तुम्ही राजकीय हिशेब करूनच हे विधेयक आत्ता मांडलं आहे. तुम्ही ही राजकीय गणितं तपासून का पाहिली? विधानसभा निवडणुकीच्या निकालाने तुम्हाला असा विचार करायला भाग पाडलं आहे. काँग्रेसने कर्नाटकात जी आश्वासनं दिली, ती आम्ही पूर्ण करत आहोत. तिथल्या महिलांनी काँग्रेसला पाठिंबा दिला, तुम्ही हे विधेयक आत्ता आणलं आहे.

# विद्यार्थ्यांना परदेशात करता येईल सराव!

| नवी दिल्ली |

वृत्तसंस्था : महाईन्यूज

देशातील वैद्यकीय विद्यार्थ्यांना आता परदेशातही वैद्यकीय सराव करता येणार आहे. नॅशनल मेडिकल कमिशन (NMC) ला जागतिक वैद्यकीय शिक्षण महासंघाने (WFME) मान्यता दिली आहे. यामध्ये भारतातील 706 वैद्यकीय महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचाही समावेश आहे.

भारतीय विद्यार्थी आता यूएस, कॅनडा, ऑस्ट्रेलिया आणि न्यूझीलंडसारख्या इतर देशांतील रुग्णांवर त्यांच्या पदवीसह उपचार करू शकतील. आतापर्यंत एमबीबीएसचे शिक्षण घेणारे विद्यार्थी केवळ भारतातच वैद्यकीय अभ्यास करू शकत होते. WFME ला 10 वर्षे परदेशात सराव करण्यासाठी राष्ट्रीय वैद्यकीय आयोगाकडून मान्यता मिळाली आहे. मीडिया रिपोर्ट्सनुसार, देशात जी काही नवीन वैद्यकीय महाविद्यालये उघडली जातील, तिथून उत्तीर्ण होणाऱ्या डॉक्टरांनाही परदेशात प्रॅक्टिस करण्याची परवानगी दिली जाईल. WFME कडून मान्यता मिळाल्यानंतर, आता भारतीय विद्यार्थी परदेशी वैद्यकीय शिक्षण आणि युनायटेड स्टेट्स वैद्यकीय परवाना परीक्षेसाठी देखील अर्ज करू शकतात. याशिवाय आता परदेशी विद्यार्थ्यांनाही भारतात येऊन एमबीबीएसचा अभ्यास करता येणार आहे.

येथून शिक्षण घेतल्यानंतर त्यांना विविध देशांमध्ये जाऊन सरावही करता येईल. डब्ल्यूएफएमईच्या या मान्यतेनंतर भारतातील शिक्षणाचा स्तर सुधारेल. अमेरिका, ऑस्ट्रेलिया, कॅनडा आणि न्यूझीलंड सारख्या देशांना आधीच मान्यता मिळाली आहे. त्याच्या मान्यतेसाठी, वैद्यकीय संस्थांना शिक्षण आणि प्रशिक्षणाचे सर्वोच्च आंतरराष्ट्रीय दर्जाचे पालन करावे लागेल.

WFME मान्यता प्रक्रियेत, प्रत्येक वैद्यकीय महाविद्यालयाला अंदाजे 50 लाख रुपये शुल्क भरावे लागते. या निधीतून WFME टीम येथे भेट देते. त्यांचा राहण्याचा खर्चही वैद्यकीय महाविद्यालयाला करावा लागतो.

सुखकर्ता दुःखहर्ता वार्ता विघ्नाची ।
नुरवी पुरवी प्रेम कृपा जयाची ॥
सर्वांगी सुंदर उटि शेंदुराची ।
कंठी झळके माळ मुक्ताफळांची ॥१॥
जय देव जय देव जय मंगलमूर्ती ।
दर्शनमात्रे मनकामना पुरती ॥धृ०॥

रत्नखचित फरा तुज गौरीकुमरा ।
चंदनाची उटी कुंकुमकेशरा ॥
हिरेजडीत मुकुट शोभतो बरा ।
रुणझुणती नूपरें चरणीं घागरिया ॥२॥
॥ जय देव जय देव०॥

माथा मुकुट मणी कानी कुंडले ।
सोंड दोंदावरी शेंदुर चर्चिले ।।
नागबंद सोंड-दोंद मिराविले ।
विश्वरूप तया मोरयाचे देखिले ॥३॥
॥ जय देव जय देव०॥

चतुर्भुज गणराज बाही बाहुटे ।
खाजयाचे लाडू करुनी गोमटे ।।
सुवर्णाचे ताटी शर्करा घृत ।
अर्पी तो गणराज विघ्ने वारीतो ॥४॥
॥ जय देव जय देव०॥

छत्रे चामरे तुजला मिरविती ।
उंदीराचे वाहन तुजला गणपती ।।
ऐसा तु कलीयुगी सकळीक पाहसी ।
आनंदे भक्तासी प्रसन्न होसी ॥५॥
॥ जय देव जय देव०॥

ता ता धि मि किट धि मि किट नाचे गणपती ।
ईश्वर पार्वती कौतुक पाहती ।।
ताल मृदंग वीणा घोर उमटती ।
त्यांचे छंदे करुनी नाचे गणपती ॥६॥
॥ जय देव जय देव०॥

लंबोदर पीतांबर फणिवरबंधना ।
सरळ सोंड वक्रतुंड त्रिनयना ॥
दास रामाचा वाट पाहे सदना ।
संकटीं पावावें निर्वाणीं
रक्षावें सुरवर वंदना ॥ ७ ॥

जय देव जय देव जय मंगलमूर्ती ।
दर्शनमात्रे मनकामना पुरती ॥
जय देव जय देव०॥

## शेंदुर लाल चढ़ायो आरती

शेंदुर लाल चढ़ायो अच्छा गजमुखको।
दोंदिल लाल बिराजे सुत गौरिहरको।
हाथ लिए गुडलड्डु सांई सुरवरको।
महिमा कहे न जाय लागत हूं पादको ॥1॥

जय जय श्री गणराज विद्या सुखदाता
धन्य तुम्हारा दर्शन मेरा मन रमता,
जय देव जय देव ॥धृ०॥

अष्टौ सिद्धि दासी संकटको बैरि ।
विघ्नविनाशन मंगल मूरत अधिकारी ।
कोटीसूरजप्रकाश ऐबी छबि तेरी ।
गंडस्थलमदमस्तक झूले शशिबिहारि ॥२॥

॥ जय देव जय देव०॥

भावभगत से कोई शरणागत आवे ।
संतत संपत सबही भरपूर पावे ।
ऐसे तुम महाराज मोको अति भावे ।
गोसावीनंदन निशिदिन गुन गावे ॥३॥

॥ जय देव जय देव०॥



# गणेश चतुर्थी आरती संग्रह

## जय गणेश जय गणेश देवा आरती

जय गणेश, जय गणेश, जय गणेश देवा।
माता जाकी पार्वती, पिता महादेवा ॥

एकदंत, दयावन्त, चार भुजाधारी,
माथे सिन्दूर सोहे, मूस की सवारी ।
पान चढ़े, फूल चढ़े और चढ़े मेवा,
लड्डुअन का भोग लगे, सन्त करें सेवा ॥

जय गणेश, जय गणेश,
जय गणेश, देवा ।
माता जाकी पार्वती,
पिता महादेवा ॥

अंधन को आंख देत,
कोढ़िन को काया,
बांझन को पुत्र देत,
निर्धन को माया।
'सूर' श्याम शरण आए,
सफल कीजे सेवा ॥

जय गणेश जय गणेश
जय गणेश देवा ।
माता जाकी पार्वती,
पिता महादेवा ॥

दीनन की लाज रखो,
शंभु सुतकारी।
कामना को पूर्ण करो
जय बलिहारी।

घालीन लोटांगण वंदीन चरण ।
डोळ्यांनी पाहिन रूप तुझे ।
प्रेमें आलिंगीन आनंद पूजन ।
भावे ओवाळिन म्हणे नामा ।।
त्वमेव माता पिता त्वमेव ।
त्वमेव बन्धुः सखा त्वमेव ।
त्वमेव विद्या द्रविणं त्वमेव ।
त्वमेव सर्वं मम देवदेव ।।
कायेन वाचा मनसेंद्रियैर्वा ।
बुध्यात्मना वा प्रकृति स्वभावात् ।
करमि यद्यत् सकलं परस्मै ।
नारायणायेती समर्पयामि ।।

अच्युतं केशवं राम नारायणम्
कृष्णदामोदरं वासुदेवं भजे।
श्रीधरं माधवं गोपिकावल्लभम्
जानकीनायकं रामचंद्र भजे ।।
हरे राम हरे राम राम राम हरे हरे
हरे कृष्ण हरे कृष्ण कृष्ण कृष्ण हरे हरे ।।

# भारतीय संघ पोहोचला उपांत्य फेरीत!

## » शफाली वर्माचे शानदार अर्धशतक! पावसामुळे सामना रद्द

नवी दिल्ली ।
नवी दिल्ली। वृत्तसंस्था

**भारतीय महिला क्रिकेट संघाचा हांगझाऊ येथील आशियाई क्रीडा स्पर्धेतील पहिला सामना पावसामुळे रद्द झाला. अव्वल मानांकित असल्याने भारताला थेट उपांत्यपूर्व सामना खेळावा लागला. मलेशियाविरुद्ध प्रथम फलंदाजी करताना टीम इंडियाने १७३ धावा केल्या. पावसामुळे सामना १५ षटकांचा करण्यात आला आणि प्रत्युत्तरात मलेशिया संघाला दोन चेंडूत केवळ एक धाव करता आली. त्यानंतर पाऊस सुरू झाल्याने पुढील खेळ होऊ शकला नाही. यानंतर सामना रद्द करण्यात आला आणि भारताने चांगल्या रँकिंगच्या आधारे उपांत्य फेरी गाठली.**

सततच्या पावसामुळे बराच वेळ वाया गेला आणि आता सामना रद्द करण्यात आला आहे. चांगल्या रँकिंगच्या जोरावर टीम इंडियाने उपांत्य फेरी गाठली आहे. आशियाई क्रीडा स्पर्धेत अव्वल मानांकित टीम इंडियाला थेट उपांत्यपूर्व फेरीचा सामना खेळण्याची संधी मिळाली. मलेशियाविरुद्धच्या सामन्यात टीम इंडियाने चांगली कामगिरी केली. संघाची नियमित कर्णधार हरमनप्रीत कौर बंदीमुळे हा सामना खेळू शकली नाही आणि स्मृती मंधानाने संघाची कमान सांभाळली. तत्पूर्वी, उपांत्यपूर्व फेरीतील पहिल्या सामन्यात मलेशियाने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. प्रथम फलंदाजी करताना भारताने १७३ धावा केल्या. पावसामुळे सामना १५ षटकांचा करण्यात आला होता. डकवर्थ लुईस नियमानुसार मलेशियासमोर १७७ धावांचे लक्ष्य आहे. भारताची सलामीवीर शफाली वर्माने अफलातून अर्धशतकी खेळी करत संघाला मजबूत स्थितीत नेले. तिने ३९ चेंडूत ६७ धावांची खेळी केली, त्यात तिने ४ चौकार आणि ५ षटकार मारले. कर्णधार स्मृती मंधानाने १६ चेंडूत २७ धावा केल्या, त्यात तिने ५ चौकार मारले. दोघांमध्ये ५७ धावांची शानदार अर्धशतकी भागीदारी झाली. त्यानंतर विकेटकीपर जेमिमाह रॉड्रिग्जने २९ चेंडूत ४७ धावांची आक्रमक खेळी केली, त्यात तिने ६ चौकार मारले. तिला रिचा घोषने ७ चेंडूत २१ धावा करत चांगली साथ दिली. मलेशियाकडून सात खेळाडूंनी गोलंदाजी केली, मात्र केवळ इस्माईल आणि इलसा यांना प्रत्येकी एक विकेट घेता आली. भारतीय संघ हा एशियाडमधील सर्वोच्च मानांकित संघ आहे. सुवर्णपदक जिंकण्यासाठी त्यांना केवळ तीन विजय मिळवावे लागतील. टीम इंडिया फायनलमध्ये पोहोचली तर हरमनप्रीतला विजेतेपदाचा सामना खेळण्याची संधी मिळेल. येथील तिन्ही सामने भारतासाठी बाद फेरीतील असतील. भारत आणि मलेशिया यांच्यातील सामना पिंगफेंग क्रिकेट फील्ड, झेजियांग युनिव्हर्सिटी ऑफ टेक्नॉलॉजी, हांगझाऊ येथे हा सामना खेळवला गेला. नऊ वर्षांनंतर आशियाई क्रीडा स्पर्धेत क्रिकेटचा समावेश करण्यात आला आहे. यापूर्वी २०१० आणि २०१४च्या आशियाई खेळांमध्ये क्रिकेटचा समावेश करण्यात आला होता, परंतु भारताने या दोन्ही स्पर्धांमध्ये एकही संघ उतरवला नाही, त्यामुळे २०१८च्या आशियाई क्रीडा स्पर्धेतून क्रिकेटला वगळण्यात आले होते. बीसीसीआयनेही या सामन्यांमध्ये शेवटच्या क्षणी संघ उतरवले आहेत. भारताने महिला आशिया चषक सात वेळा जिंकला आहे तसेच, भारतीय संघ सध्याचा आशियाई चॅम्पियनही आहे. तीन टी२० विश्वचषकांमध्ये उपांत्य फेरीत किंवा त्यापुढेही मजल मारली आहे.



भारत: स्मृती मंधाना (कर्णधार), शफाली वर्मा, जेमिमाह रॉड्रिग्ज, रिचा घोष (यष्टीरक्षक), देविका वैद्य, दीप्ती शर्मा, मिन्नू मणी, पूजा वस्त्राकार, राजेश्वरी गायकवाड, कनिका आहुजा, अमनजोत कौर.

मलेशिया: आइना हमिझाह हाशिम, विनिफ्रेड दुराईसिंगम (कर्णधार), मास अलिसा, वान ज्युलिया (विकेटकीपर), माहिरा इज्जती इस्माईल, आयना नजवा, वान नूर जुलैका, नूर अरियाना नटस्या, अस्या अलिसा, नूर दानिया सिउहादा, निक नूर अटिएला.

### पाकिस्तानचा सामना इंडोनेशियाशी

» भारताचा आशिया खंडातील उत्कृष्ट विक्रम लक्षात घेता तो येथे सुवर्णपदकाचा दावेदार मानला जात आहे. भारत, पाकिस्तान, श्रीलंका आणि बांगलादेश या अव्वल चार संघांना थेट उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश देण्यात आला आहे. मलेशियाने मंगळवारी हाँगकाँगचा २२ धावांनी पराभव केला. त्यामुळे आज ते भारताविरुद्ध सामना खेळत आहेत. भारत आणि मलेशिया याआधीही दोनदा भिडले आहेत, त्यात दोन्ही वेळा भारताने विजय मिळवला आहे. उपांत्यपूर्व फेरीत भारताने विजय मिळवला असून उपांत्य फेरीत त्यांचा सामना बांगलादेशशी होऊ शकतो. दुसरीकडे पाकिस्तानचा सामना इंडोनेशियाशी होणार आहे.

# नॉर्खिया नंतर आणखी खेळाडू वर्ल्ड कपमधून बाहेर!

## » अक्षर पटेलच्या जागी अश्विनचा विश्वचषक संघात समावेश

नवी दिल्ली ।
नवी दिल्ली। वृत्तसंस्था

**दक्षिण आफ्रिकेचा वेगवान गोलंदाज ॲनरिक नॉर्खिया पाठीच्या दुखापतीमुळे भारतात होणाऱ्या आगामी २०२३ विश्वचषकातून बाहेर पडला आहे. सराव सत्रादरम्यान अंगठ्याला झालेल्या दुखापतीमुळे २९ वर्षीय खेळाडूला २०१९च्या विश्वचषकालाही मुकावे लागले. रेव्हस्पोर्ट्सच्या म्हणण्यानुसार, “गुडघ्याच्या दुखापतीमुळे सिसांडा मागाला देखील स्पर्धेत मुकल्याने दक्षिण आफ्रिकेच्या संधींना आणखी एक धक्का बसला आहे.**



दक्षिण आफ्रिकेच्या महत्त्वाच्या खेळाडूंपैकी एक नॉर्खिया, ब्लूमफॉन्टेन येथे ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या दुसऱ्या एकदिवसीय सामन्यात केवळ पाच षटके टाकू शकला कारण तो पाठीच्या आणि अंगठ्याच्या समस्येने त्रस्त आहे. त्याने आपल्या हिट-द-डेक गोलंदाजीतील कौशल्याने दक्षिण आफ्रिकेच्या संघासाठी खूप सामने जिंकवून दिले आहेत.

त्यामुळे तो विश्वचषक २०२३मध्ये दक्षिण आफ्रिकेसाठी महत्त्वपूर्ण असल्याचे सिद्ध केले आहे मात्र, दुखापतीमुळे तो वर्ल्डकपला मुकणार आहे. नॉर्खियाने २२ एकदिवसीय सामन्यांमध्ये २७.२७च्या सरासरीने ३६ विकेट्स घेतल्या आहेत. दरम्यान, मागालाने आठ एकदिवसीय सामन्यांमध्ये २५.४च्या प्रभावी सरासरीने १४ विकेट्स घेतल्या आहेत. आता त्याच्या जागी अनुभवी अष्टपैलू अँडिले फेहलुकवायो बदली खेळाडूंपैकी एक असू शकतो. या अष्टपैलू खेळाडूने ७६ एकदिवसीय सामने खेळले असून त्यात त्याच्या नावावर ८९ विकेट्स आहेत. लिझाड विल्यम्स आणि वेन पारनेल हे देखील समीकरणात येऊ शकतात. दक्षिण आफ्रिका ७ ऑक्टोबर रोजी नवी दिल्लीतील अरुण जेटली स्टेडियमवर श्रीलंकेविरुद्धच्या सामन्याने विश्वचषक मोहिमेची सुरुवात करेल. एकदिवसीय विश्वचषक २०२३ला ५ ऑक्टोबरपासून सुरू होणार आहे. भारतात होणाऱ्या या स्पर्धेपूर्वी खेळाडूंच्या दुखापती ही सर्वच संघांसाठी समस्या बनली आहे. प्रत्येक संघात असे काही खेळाडू आहेत जे दुखापतीने त्रस्त आहेत किंवा ते पूर्णपणे तंदुरुस्त नाहीत. सर्वात मोठी समस्या ऑस्ट्रेलिया आणि श्रीलंकेची आहे. पाकिस्तान आणि न्यूझीलंड संघही अडचणीत आले आहेत. मात्र, भारतासाठी चांगली गोष्ट म्हणजे लोकेश राहुल आणि श्रेयस अय्यर तंदुरुस्त आहेत. अक्षर पटेल दुखापतग्रस्त आहे, पण तो संघातील महत्त्वाचा खेळाडू नाही. अक्षरच्या जागी अश्विनचा विश्वचषक संघात समावेश केला जाऊ शकतो. टेम्बा बावुमा (कर्णधार), जेराल्ड कोएत्झी, क्विंटन डी कॉक, रीझा हेंड्रिक्स, मार्को जॅन्सन, हेनरिक क्लासेन, केशव महाराज, एडन मार्कराम, डेव्हिड मिलर, लुंगी एनगिडी, कागिसो रबाडा, तबरेझ शम्सी आणि रॅसी व्हॅन डर डुसेन.

### लोकेश राहुल आणि श्रेयस अय्यर तंदुरुस्त

» एकदिवसीय विश्वचषक २०२३ला ५ ऑक्टोबरपासून सुरू होणार आहे. भारतात होणाऱ्या या स्पर्धेपूर्वी खेळाडूंच्या दुखापती ही सर्वच संघांसाठी समस्या बनली आहे. प्रत्येक संघात असे काही खेळाडू आहेत जे दुखापतीने त्रस्त आहेत किंवा ते पूर्णपणे तंदुरुस्त नाहीत. सर्वात मोठी समस्या ऑस्ट्रेलिया आणि श्रीलंकेची आहे. पाकिस्तान आणि न्यूझीलंड संघही अडचणीत आले आहेत. मात्र, भारतासाठी चांगली गोष्ट म्हणजे लोकेश राहुल आणि श्रेयस अय्यर तंदुरुस्त आहेत. अक्षर पटेल दुखापतग्रस्त आहे, पण तो संघातील महत्त्वाचा खेळाडू नाही. अक्षरच्या जागी अश्विनचा विश्वचषक संघात समावेश केला जाऊ शकतो